**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय व इतर ७ खंडपीठांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना अंतर्गत उमेदवार घेण्यास मान्यता देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: साप्रवि-१२०२३/६१/२०२४-साप्रवि (कक्ष-६)**
१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६.

**संदर्भ** :- १) राज्य माहिती आयोग मुख्यालय यांचे पत्र क्र. मुमाआ २०२४/संक्र ३८४/०२ दि.२४.११.२०२५.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- साप्रवि-१२०२३/६१/२०२४साप्रवि (कक्ष ६), दिनांक १३ डिसेंबर, २०२४.
३) कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन परिपत्रक क्रमांक आयटीआय २०२३/प्र.क्र.९४/व्यशि ३. दि.१४.०२.२०२४.
४) कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्रमांक आयटीआय २०२०/प्र.क्र.१२७/व्यशि ३. दि.०३.०६.२०२१.

**प्रस्तावना**:- कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाने संदर्भ क्र.३ येथील परिपत्रक व संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयांन्वये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. सदर सूचनास अनुसरुन संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयांन्वये महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय व इतर ७ खंडपीठांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना अंतर्गत उमेदवार घेण्यास मान्यता दिली आहे. सदर मान्यतेचा कालावधी मार्च २०२६ मध्ये संपुष्टात येत असल्यामुळे राज्य माहिती आयोगाने संदर्भ क्र १ येथील पत्रांन्वये सदर योजना चालु असे पर्यंत या योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवार घेण्यास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय**:- शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय व इतर ७ खंडपीठांमध्ये प्रत्येकी ४ याप्रमाणे एकूण ३२ शिकाऊ उमेदवार नियुक्त करण्यास सदर योजना चालु असे पर्यंत खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) शिकाऊ उमेदवारांची संख्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन परिपत्रकातील २५% मर्यादेतच राहील
२) विद्यावेतन व इतर देयके याकरिता आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध असणे बंधनकारक राहील.

३) प्रशिक्षणाचा कालावधी, अटी व शर्ती या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन परिपत्रक व निर्णयांनुसार लागू राहतील.

४) शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतन कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन परिपत्रकात नमुद दराने व भविष्यात होणाऱ्या सुधारणेनुसार अनुज्ञेय राहील.

२) उपरोक्त योजनेसाठी होणारा खर्च सद्यस्थितीमध्ये मागणी क्र.ए-४, मुख्य लेखाशिर्ष २०५२, सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (००) (०९२) इतर कार्यालये (०१) सामान्य प्रशासन विभाग (०१) (०२) राज्य माहिती आयोग, अनिवार्य (२०५२ ५४२१) अंतर्गत १०-कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधी मधून भागविण्यात यावा. पुढील आर्थिक वर्षात या योजनेसाठी उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत ३४-शिष्यवृत्ती व विद्यावेतन हे नवीन उद्दिष्ट उपलब्ध करुन घेण्यात येईल.

३) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०२२६१४३२२९१७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2026.02.26 14:33:48 +05'30'

**(हेमंत महाजन)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय मुंबई
२. महालेखापाल, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. उपसचिव , राज्य माहिती आयोग (सर्व खंडपीठे).
६. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्या.- अर्थसं (२६), मंत्रालय, मुंबई-३२.
७. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्या.- रोखशाखा (२५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. निवड नस्ती, सा.प्र.वि./कार्या.- माहिती (६).